# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

उपजिल्हाधिकारी कक्ष,झोपुप्रा-मुंबई.
क्र. झोपुप्रा/उजि./कार्या-2/टे/डी-2/ परिपत्रक/2014 | ६६०
दिनांक :- -4 JUL 2014

परिपत्रक क्र. १४८

विषय :-महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास), अधिनियम 1971 ची कलमे 33 व 38 सुधारीत कलम 33(अ) नुसार पात्र/अपात्र झोपडीधारकांविरुध्द कारवाई करणेबाबत.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास), अधिनियम 1971 मधील कलम 33 व 38 व सुधारीत कलम 33(अ) मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाकडून क्र. झोपुप्रा/उजि/परिपत्रक/1032/2013, दि31/07/2013 नुसार परिपत्रक क्र.143 निर्गमित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास), अधिनियम 1971 चे सुधारीत कलम 33(अ) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये असहकार करणा-या पात्र/अपात्र झोपडीधारकांच्या विरुध्द निष्कासनाच्या कार्यवाही बाबत खालील सुधारित कार्य पध्दती निश्चित करण्यात येत आहे.

पात्र झोपडीधारकांविरुध्द करावयाची कार्यवाही.

1) विकासक/संस्था/वास्तुविशारद यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत किंवा प्रकल्पात सहभागी होण्यासाठी इच्छुक नसलेल्या पात्र झोपडपट्टी रहिवाश्यांच्या निष्कासनाच्या कार्यवाहीबाबतचे सर्व प्रस्ताव प्राधिकरणाने विहीत केलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिकारी यांचेकडे खालील कागदपत्रांसह समक्ष सादर करावेत.

अ) प्रत्येक असहभागी पात्र झोपडीधारकास, योजनेत सामील झालेल्या झोपडीधारकांप्रमाणेच पुनर्वसन सदनिका / संक्रमण शिबिरात कोठे जागा/ गाळा किंवा भाडे देण्यात येणार आहे असे पात्र झोपडीधारकांना लेखी सूचना दिलेल्या पत्राची सत्यप्रत व झोपडीधाकांना सदरहू सूचना पाठविल्याची पोच पावती.

ब) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मान्यता मिळालेले कागदपत्रे उदा.LOI, IOA.

क) झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेले परिशिष्ट-2.

D:\Santosh\santosh\Circular\Action ३३ & ३८.doc

2) विकासक/संस्था/वास्तुविशारद यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर पात्र झोपडीधारकांविरुध्द सक्षम प्राधिकारी यांनी कलम 33अ मधील (ई) व (फ) नुसार कार्यवाही करावी व त्यानंतर कलम 33/38 नुसार निष्कासनाची कार्यवाही करावी.

3) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या पहिल्या इमारतीस बांधकाम परवानगी मिळेपर्यंत जे पात्र झोपडीधारक योजनेमध्ये सामील होत नसतील अशा झोपडीधाकांची तयार होणारी सदनिका/गाळे ताब्यात घेण्यायाबाबतचा सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर करावा.

**<u>अपात्र झोपडीधारकांविरुध्द करावयाची कार्यवाही.</u>**

अपात्र झोपडीधारकांविरुध्द निष्कासनाच्या कार्यवाही बाबतचे प्रस्ताव विकासक/संस्था/ वास्तुविशारद यांनी संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर करावेत. सक्षम प्राधिकारी यांनी कलम 33 व 38 मधील तरतुदीनुसार रितसर कार्यवाही करावी.

(स्वाक्षरी)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

प्रत :- 1.अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई पूर्व उपनगरे/मुंबई पश्चिम उपनगरे.
2.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी/झोपुप्रा यांचे स्विय सहाय्यक.
3.सचिव/झोपुप्रा.
4.सर्व सक्षम प्राधिकारी.
5.वित्त नियंत्रक/झोपुप्रा.
6.उपमुख्य अभियंता/झोपुप्रा
7.उपजिल्हाधिकारी/झोपुप्रा.
8.सहनिबंधक/झोपुप्रा.
9. जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख /झोपुप्रा
10. कार्यकारी अभियंता, शहर/पूर्व/पश्चिम उपनगरे/झोपुप्रा.
11. तहसिलदार प्रशासन/झोपुप्रा.
12. सहाय्यक निबंधक/झोपुप्रा.
13. विधि सल्लगार/झोपुप्रा.
14.सहाय्यक संचालक नगर रचना/झोपुप्रा.
15.प्रशासकीय अधिकारी/झोपुप्रा.
16. माहिती तत्रज्ञान अधिकारी/झोपुप्रा.
17. जन संपर्क अधिकारी/झोपुप्रा.
18. निवड संचिका.

D:\Santosh\santosh\Circular\Action 33 & 3c.doc

प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051.
दुरध्वनी क्र.2656800/26590405/1879, फॅक्स क्र.91-22-26590457. संकेतस्थळ: www.sra.gov.in ई-मेल info@sra.gov.in